# कार्यालय नगर परिषद हिंगणघाट

जिल्हा वर्धा.(महा.)–442301

Email.hinganghatmc @gmail.com
Phone &Fax No.07153-245977

पत्र क नपाहि / पापू / कावी– 58 /2020
दिनांक :– 20 / 08 /2020

प्रति,

मे. सोम इलेक्ट्रीकल्स,
409, एनआयटी कमर्शिअल कॉम्पलेक्स,
सिताबर्डी
नागपूर –440012

**विषय :– केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत हिंगणघाट मलनिस्सारण योजना जि. वर्धा विद्युत व यांत्रिकी कामांची निविदा – कार्यारंभ आदेश.**

संदर्भ :– 1) ई –निविदा सुचना 2019–20
2) सर्वसाधारण सभेची अपेक्षित मंजुरी दिनांक 13.05.2020
3) कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मुंबई यांचे पत्र क. बैठक–2020 / प्र.क. –49 / नवि–33 दिनांक 14.08.2020

वरील विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रांनुसार आपली विषयांकीत कामाची निविदा मंजुर करण्यात आलेली आहे. आपण वरील कामाची सुरक्षा ठेव एकुण रू. 4,07,000 / – जमा ठेव रसिद एफ. डी.आर क. 870745110012124 ( Bank Of India) दिनांक 18.08.2020 अन्वये (12 महिन्यांकरीता ) जमा केल्यामुळे वरील विषयांकीत कामाची अंदाजीत किंमत रू .2,14,38,939 / – ला 5.10 टक्के कमी दराने म्हणजेच 2,03,45,553 / – ला हिंगणघाट नगर पालिका, हिंगणघाट च्या वतीने स्विकारण्यात येत आहे.

निविदेतील कामी चालु दरसुची नुसार मुल्यांकीत किंमत व त्यानुसार देकाराची तुलना

1. शासन निर्णय क. बी.सी.ए. 2009 / प्र.क. / 108 / कामगार 7 अ / दिनांक रू. 2,03,456 / – दिनांक 17.06. 2010 अन्वये विचारात घ्यावयाच्या 1 टक्के कामगार कल्याण उपकरासाठीची तरतुद व इतर तरतुद
2. कामाची चालु दरसुची नुसार मुल्यांकीत किंमत रू. 2,17,96,244 / –
3. अंतिम वाटाघाटी नुसार कंत्राटदाराच्या देकाराची किंमत निविदा दराच्या 5.10 टक्के कमी दराने म्हणजेच रू. 2,03,45,553 / –
4. निविदा पुर्व बैठकीत इतिवृत्त व सदर निविदा प्राप्त झाल्यापासुन निविदेच्या अनुषंगाने झालेला पत्रव्यवहार हा निविदेचाच एक भाग असुन तो या निविदेस लागु राहील.
5. कामाच्या मुल्यांकीत किंमतीमध्ये लेबरसाठी लेबर किंमतीच्या 1 टक्का कामगार सुविधा निधी गृहीत धरण्यात आलेला असून सदर प्रकरण संचालक (वित्त), मजीप्रा, नवी मुंबई यांचे परीपत्रक कमांक मजीप्रा / वित्त–2 / लेबर एमोनिटीज / 969 दिनांक 23.09.2016 अन्वये सुचनेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
6. आपणास हे पत्र प्राप्त होताच 1 महिण्याचे आत शासकीय विमा काढावा, तसेच कामाला सुरवात करून नमुद केल्याप्रमाणे (12) बारा महिने (पावसाळयासह) कालावधीत काम पुर्ण करावे. तसेच निविदेतील अटी व शर्ती नुसार कामे करणे आवश्यक आहे. नियमानुसार व प्रचलित परिपत्रका प्रमाणे उपकर निधी 1 टक्के रक्कम देयकातुन कपात करण्यात येईल तसेच भाववाढ देय राहणार नाही हयाची नोदं घ्यावी.
7. प्रचलित कर शासकीय नियमाप्रमाणे कामाच्या देयकामधुन कपात करण्यात येईल. तसेच निविदापूर्व बैठक दिनांक 07.01.2020 मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे प्रचलित कर प्रणालीमध्ये बदल झाल्यास सदर बदलापोटी येणा–या रक्कमेचा फरक करारनाम्या अंतर्गत भुगतान किंवा वसुल करण्यात येईल.
8. अमृत अभियानाअंतर्गत निधीच्या उपलब्धते नुसार उपलब्ध अनुदानातुन देयकाची रक्कम अदा करण्यात येईल.

कृपया विषयांकीत कामाचे संदर्भात पाणी पुरवठा अभियंता (यांत्रीकी) नगर परिषद हिंगणघाट यांचेशी तसेच सदर कामाकरीता नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग वर्धा द्वारे प्राधिकृत अभियंता (यांत्रीकी) यांचेशी संपर्क साधुन हयांचे निदर्शनाखाली कामे करावे.

कृपया पत्राची पोच द्यावी.

नगर परिषद, हिंगणघाट

मुख्याधिकारी गट–अ
नगर परिषद,हिंगणघाट